पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६८**

(सभावृत्तांत)

दिनांक – १९/०६/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १९/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
९. मा.लांडगे सारिका संतोष
१०. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
११. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१२. मा.बारणे अर्चना तानाजी
१३. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.राऊत, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.लडकत, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.पवार, मा.देशमुख, मा.धानोरकर,- कार्यकारी अभियंता, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट, मा.आगळे – प्रशा.अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१७) सन २०१८-१९ च्या स्थापत्य विभागाकडील अंदाजपत्रकातील कामांची सुधारीत प्रशासकिय मान्यता व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. (वाढ/घट र.रू.२११,५६,८३,१००/-)

विषय क्र.१८) सन २०१८-१९ च्या इ.डब्ल्यु.एस. विभागाकडील अंदाजपत्रकातील कामांची सुधारीत प्रशासकिय मान्यता व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. (वाढ/घट र.रू.७,३५,००,०००/-)

विषय क्र.१९) सन २०१८-१९ च्या विद्युत विभागाकडील अंदाजपत्रकातील कामांची सुधारीत प्रशासकिय मान्यता व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. (वाढ/घट र.रू.४,५०,००,०००/-)

विषय क्र.२०) सन २०१८-१९ मध्ये चालू असलेल्या व नियोजीत स्थापत्य प्रकल्प कामामध्ये समाविष्ट असलेल्या विद्युत विभागा अंतर्गत लेखाशिर्षावर कामे वर्ग करणे प्रशासकिय मान्यता घेणे व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. (वाढ/घट र.रू.३३,४६,००,०००/-)

विषय क्र.२१) सन २०१८-१९ च्या विद्युत विभागातील अंदाजपत्रकातील कामांची सुधारीत प्रशासकीय व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. (वाढ/घट र.रू.८,००,००,०००/-)

विषय क्र.२२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) अन्वये मंजुर विकास कामांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत व तरतूद वर्गीकरण करणेबाबत. (वाढ/घट र.रू.९,०५,००,०००/-)

विषय क्र.२३) मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) अन्वये मंजुर विकास कामांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत व तरतूद वर्गीकरण करणेबाबत. (वाढ/घट र.रू.१६,००,००,०००/-)

विषय क्र.२४) मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) अन्वये मंजुर विकास कामांना प्रशासकिय मान्यता देणेबाबत व तरतूद वर्गीकरण करणेबाबत. (वाढ/घट र.रू.१०,५०,००,०००/-)

विषय क्र.२५) शहरी गरीब, वैद्यकिय, सहाय्य योजना सुरू करणेबाबत.

विषय क्र.२६) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे बो-हाडेवाडी येथील स.नं/गट नं.१२८५पै, १२८७पै व १२९०पै (आरक्षण क्र.१/१६२) येथे आर्थिक दृष्ट्या घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणे प्रकल्पास Environmental Clerance घेणेबाबत.

विषय क्र.२७) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८०५ दि.१३/६/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत.

---------

दिनांक १३/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक -२८०८ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – औ.प्र.संस्था कासारवाडी

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रसंमु/०१/कावि/११०/२०१८ दि.२४/०५/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी येथे मा.आयुक्तसो. यांचे कडील आदेश क्रमांक औप्रसंमु/१/कावि/३२१/२०१७ दिनांक १७/११/२०१७ अन्वये खालील मानधन निदेशकांना दिनांक २४/१०/२०१७ ते २३/०४/२०१८ या सहा महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात र.रू.२५,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त) नेमणूक देण्यात आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी दिनांक २३/०४/२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि खाली नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०५ मानधन निदेशकांनी मनपा सेवेमध्ये नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे महानगरपालिका विरूध्द दावा क्र.११६५१/२०१६ दाखल केलेला आहे. त्याचा निकाल दिनांक २२/०१/२०१८ रोजी सदर ५ मानधन निदेशक यांचे बाजूने लागला असून त्यांना मनपा सेवेत नियमित वेतन श्रेणीमध्ये सामावून घेणेबाबतचे कोर्टाचे आदेश आहेत. तथापि सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्याची कार्यवाही सुरू असल्याने या बाबत अंतिम निर्णय होईपर्यंत खालील मानधनारील ५ निदेशंकाना एकत्रित मानधनावर हंगामी तात्पुरत्या स्वरुपाची नेमणूक द्यावी लागेल.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीम. कुमावणी मनसरा गोपीराम | मानधन निदेशक |
| २ | श्रीम. निलवर्ण सोनाली पांडूरंग | मानधन निदेशक |
| ३ | श्री. कांबळे सिध्दार्थ अभिमन्यु | मानधन निदेशक |
| ४ | श्रीम. कोंडे हेमाली बाळकृष्ण | मानधन निदेशक |
| ५ | श्रीम. चिंचवडे वंदना नरसिंग | मानधन निदेशक |

तरी उपरोक्त अनु.क्र.०१ ते ०५ मानधन निदेशकांना दिनांक २४/०४/२०१८ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक २५/०४/२०१८ ते दिनांक २४/१०/२०१८ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता आयटीआय कासारवाडी येथील मानधन निदेशक यांना दरमहा एकत्रित र.रू.२५,०००/- मानधनावर हंगामी तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०९ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/०३/कावि/१७७/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६ कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख) फक्त तरतूद करणेत आली असून या मध्ये संचलनतूट ८१.५६ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.२३ कोटी व बसेस खरेदी र.रु.६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून जून २०१८ ची रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेस पोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु.सात कोटी पन्नास लाख) फक्त या प्रमाणे माहे जून २०१८ अखेर ०१ महिन्याची अग्रीम स्वरुपात अदा करावयाचे असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१० विषय क्रमांक - ०३

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – म.सा. भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक– मा. सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.मसाभां/०५/कावि/२१३/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तालेरा रुग्णालयातील नवीन इमारतीमध्ये नवीन गॅस पाईपलाईन करण्याकरीता आवश्यक लागणारा कॉम्प्रेसर विद अक्सेसरीज व व्हॅक्युम पंप या उपकरण/ साहित्ये खरेदीकरीता GST Impact नुसार कमी केलेल्या दरानुसार खरेदी करणेकामी M/s.Shree Construction यांचेकडील ६ आयटेम करीता र.रु.१,२३,४५७/- व M/s. Kothari Medical यांचेकडील ६ आयटेम करीता र.रु.२४,२६,८५८/- असे एकूण र.रु.२५,५०,३१५/- (अक्षरी र.रू. पंचवीस लाख पन्नास हजार तीनशे पंधरा फक्त) चे खर्चास तसेच M/s.Shree Construction यांचेकडील निविदेतील आयटेम क्रमांक - ०९ ते १२ रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार खरेदी करण्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८११ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – वैद्यकिय मुख्य

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे क्र.वैद्य/०७/कावि/९८७/२०१८ दि.१२/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत जन्म-मृत्यु नोंदीची डेटा एन्ट्री करणे, नोंदी दुरूस्ती करणे व दाखले वितरीत करणेचे कामकाज ई-निविदा सुचना

क्र.०३/२०१७-१८ मधील लघुत्तम निविदाधारक मे.शुभम उद्योग यांचे प्राप्त झालेल्या लघुत्तम दर प्रति दाखला दर र.रू.३.९९ या दराने करारनामा करून ५ वर्षे या कालावधीसाठी अंदाजित रक्कम रूपये ८६,००,०००/- (अक्षरी र.रू.शहाऐंशी लाख फक्त) मध्ये कामकाज करून घेणेस व याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१२ विषय क्रमांक - ०५
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्र.मुलेप/०६/कावि/१०९/२०१८ दि.११/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२८/०५/२०१८ ते दि.०३/०६/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०९/२०१८ दि.११/०६/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१३ विषय क्रमांक - ०६
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – ग क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे क्र.गक्षेका/नि-३/कावि/१६३/२०१८ दि.०४/०६/२०१८

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते ५) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१४ विषय क्रमांक - ०७
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे क्र.स्था/उद्यान/कावि/२४०/२०१८ दि.१३/०६/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ११०/०१/२०१७-१८ मधील काम क्र.१

अन्वये, गुलाब पुष्प उद्यानाजवळील मोकळया जागेवर प्राणी संगोपन केंद्र उभारणेकामी मे.पी.ए.शिरोळे इंजिनियर्स & कॉन्ट्रॅक्टर्स निवीदा र.रु.३२,६७,९७३/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख, सदुसष्ठ हजार, नऊशे त्र्याहत्तर फक्त) पेक्षा १९.००% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२६,४७,०५८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१५ | विषय क्रमांक - ०८

दिनांक – १९/०६/२०१८ | विभाग – स्थापत्य BRTS

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. बीआरटीएस/स्था/३८२/२०१८ दि.१३/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे मुकाई चौक ते भक्ती शक्ती चौकापर्यंत मनपाचे मंजुर विकास आराखड्यातील ४५ मी.रुंद बीआरटीएस रस्ता विकसीत करण्याचे काम हाती घेतले आहे. सदर रस्त्याचे निसर्ग दर्शन सोसायटी येथे पुणे-मुंबई लोह मार्गामुळे दोन भागात विभाजन होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी लोहमार्गावर उड्डाणपुल (ROB) बांधणे आवश्यक आहे. या कामाची नि.र.रु.८७,४६,५०,२६६/- असुन निविदा क्रमांक स्थापत्य/मुख्यालय/HO/39/1/15-16 अन्वये निविदा कार्यवाही करुन ठेकेदार मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना कामाचा आदेश देण्यात आला आहे. सदर रस्त्यावरील प्रस्तावित निसर्ग दर्शन सोसायटी, रावेत येथील रेल्वे किमी.१७०/१६A-१७०/१७A मधील रेल्वे उड्डाणपूलाचे (ROB) संकल्पचित्र (GAD) मध्य रेल्वे पुणे यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. सदर उड्डाणपुलाच्या संकल्प चित्रानुसार रेल्वेलाईन नजिक अस्तितवात असलेले सब स्टेशन हलविणे आवश्यक वाटते, त्यानुसार मध्य रेल्वेने (Central Railway) सदर जागेवर पाहणी करुन सबस्टेशन स्थलांतरित करणेचे अंदाजपत्रक तयार केले असुन, दि.२४/७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये र.रु.५,७७,६३,०४३/- स्थलांतरण शुल्क मध्य रेल्वेकडे जमा करणेची मागणी केली होती. त्यानुसार मा. आयुक्त सो यांच्या दि. १४/१२/२०१६ रोजी मंजुर प्रस्तावान्वये व आदेश क्र.जा.क्र.बीआरटीएस/स्था/८४६/२०१६, दि.२६/१२/२०१६ अन्वये तसेच धनादेश क्र.६७८१५८, दि.३१/१२/२०१६ अन्वये र.रु.५,५४,२५,१५९/- इतकी मध्य रेल्वे (Central Railway) विभागास अदा करणेत आलेली आहे. तसेच दि.२५/११/२०१७ व दि.१४/५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (कर्षण) पुणे, यांनी केंद्रिय रेल्वे विद्युत विभाग यांनी र.रु.९,९४,६४१.५८ + २८,९१,७०० असे एकुण ३८,८६,३४१.५८ मागणी केलेली आहे. सदरची बाब सब स्टेशन हलविणे करीता आवश्यक ३ किमी लांबीच्या फीडर वायर मुळे वाढ होत असल्याचे कळविले आहे. सब स्टेशन हलविणे करीता संभाव्य दिरंगाई टाळणेच्या दृष्टीने सदरची रक्कम त्वरीत भरणेची विनंती केली आहे. तरी रेल्वे उड्डाणपुलाचे संकल्पचित्र व

आराखड्यानुसार (Drawing & Design, GAD) रेल्वे लाईन नजिक अस्तितवात असलेले सब स्टेशन हलविणे आवश्यक असल्याने मध्य रेल्वेने (Central Railway) सबस्टेशन स्थलांतरित करणेसाठी आवश्यक वाढीव रक्कमेची केलेल्या मागणी नुसार र.रु.३८,८६,३४१.५८ (अक्षरी रक्कम रूपये अडतीस लाख शहाऐंशी हजार तीनशे एक्केचाळीस व अठ्ठावण्ण पैसे फक्त) स्थलांतरण शुल्कअदा करणेस तसेच भविष्यात यापुढे सदर कामांतर्गत अचानक उदभवणा-या घटनांमुळे बदल करावयाची आवश्यकता असल्यास व त्यापोटी वाढीव खर्च रेल्वे बोर्डास अदा करावयाची आवश्यकता असल्यास व शासन मंजूर कर प्रणालीमध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे वाढीव खर्च निसर्ग दर्शन सोसायटी जवळ रेल्वे लाईनवर उड्डाणपुल बांधणेच्या कामाची तरतुद सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील पान क्र.५२२ अ.क्र.०८ वरील र.रु.४०.० कोटी मधुन नमूना नं.२२ अन्वये अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१६ विषय क्रमांक - ०९

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८

विषय - आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधीचे चे खाते बंद करून उपलब्ध शिल्लक रक्कम सर्वसाधारण निधीकडे वर्ग करणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१७ विषय क्रमांक - १०

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे क्र. जनि/२/कावि/१०५४/२०१८ दि.१२/०६/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.21/8/2017-18 अन्वये चिंचवड मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत काळभोरनगर, मोहननगर रामनगर या भागात उर्वरित ठिकाणी जलनि:सारण नालिका टाकणे व जलनि:सारण विषयक कामे करणेकामी M/s S K Bhosale Contractor यांनी नि.र.रू.49,99,993/- (अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार नऊशे त्र्याण्णव फक्त) पेक्षा 26.00% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 36,99,995/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१८ विषय क्रमांक - ११
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्र. मुलेप/१/कावि/७१४/२०१८ दि.१४/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८१९ विषय क्रमांक - १२
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – क क्षेत्रीय विद्युत
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे क्र. नि/क/कावि/३/२०१८ दि.१२/०६/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ(१) मधील निविदा कामांचे अवलोकन होवून नियमानुसार व निविदा अटीशर्तीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२० विषय क्रमांक - १३
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता (पा.पु.) यांचे क्र. जशुके/वि/४/१०२/२०१८ दि.११/०६/२०१८

मा.सह शहर अभियंता (पा.पु.) यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा.च्या जाधववाडी पंप हाऊस येथे वाढीव वीजभार घेणेसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे करारनामा शुल्क, अतिरीक्त अनामत रक्कम, कनेक्शन चार्जेस प्रोसेसिंग फी व जीएसटी इ. असे एकूण र.रू.४७,००५/- (अक्षरी र.रू. सत्तेचाळीस हजार पाच फक्त) म.रा.वि.वि. कं.स अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२१ विषय क्रमांक - १४
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त क्र. लेखा/६/कावि/६९७६/२०१८ दि.१३/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता, बीआरटीएस विभाग यांनी दि.४/६/२०१८ चे प्रस्तावान्वये क्र.१ कामामधील आवश्यक असलेली तरतूद शिल्लक ठेवून उर्वरीत रक्कम क्र.२ कामासाठी उपलब्ध करून देणेकामी प्रस्तावित केलेले आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी फक्त) विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.१,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२२ विषय क्रमांक - १५
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त क्र. लेखा/६/कावि/६९७७/२०१८ दि.१३/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचार घेवून –

सह शहर अभियंता, बीआरटीएस विभाग यांनी दि.४/६/२०१८ चे प्रस्तावान्वये क्र.१ कामामधील आवश्यक असलेली तरतूद शिल्लक ठेवून उर्वरीत रक्कम क्र.२ कामासाठी उपलब्ध करून देणेकामी प्रस्तावित केलेले आहे.तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रू.९०,००,०००/- (अक्षरी र.रू.नव्वद लाख फक्त) विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रू.९०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२३ विषय क्रमांक - १६
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी क्र. डक्षेका/३/कावि/३८०/२०१८ दि.१५/०६/२०१८

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते १)) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम

दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -२८२४ विषय क्रमांक - १७

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१७४/२०१८ दि.१८/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

शहर अभियंता अ व फ क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून रक्कम रुपये २११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणे शक्य आहे तरी अ व फ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेस भांडवली/ महसूली प अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ ची तरतूद अ व फ क्षेत्रीय र.रू.२११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.महापालिकासभेची मान्यता घेणेकामी तातडीचे कामकाजा संबंधातील सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील १ (के) अन्वये माहे जून २०१८ चे मा.महापालिकासभेचे कामकाजात दाखल करून घेणेची मागणी मा.महापालिका सभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.२११,५६,८३,१००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२५ विषय क्रमांक - १८
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१७५/२०१८ दि.१८/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता इ.डब्ल्यु.एस. कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग/ मुख्यालयातील भांडवली/महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून रक्कम रुपये ७,३५,००,०००/- वर्गीकरण करणे शक्य आहे. तरी विद्युत/ यांत्रिकी कार्यालयासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेस प्रभाग अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ ची तरतूद विद्युत/यांत्रिकी र.रू.७,३५,००,०००/- वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.महापालिकासभेची मान्यता घेणेकामी तातडीचे कामकाजा संबंधातील सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील १ (के) अन्वये माहे जून २०१८ चे मा.महापालिकासभेचे कामकाजात दाखल करून घेणेची मागणी मा.महापालिका सभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.७,३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२६ विषय क्रमांक - १९
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. लेखा/६/कावि/७१७६/२०१८ दि.१८/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता (वि/यां) क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे . यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग अंदाजपत्रक

यातून रक्कम रुपये ४,५०,००,०००/- वर्गीकरण करणे शक्य आहे. तरी (वि/यां) कार्यालयाला प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार सह शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेस प्रभाग अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ ची तरतूद विद्युत/यांत्रिकी र.रू.४,५०,००,०००/- वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.महापालिकासभेची मान्यता घेणेकामी तातडीचे कामकाजा संबंधातील सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील १ (के) अन्वये माहे जून २०१८ चे मा.महापालिकासभेचे कामकाजात दाखल करून घेणेची मागणी मा.महापालिका सभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.४,५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२७ विषय क्रमांक - २०

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. लेखा/६/कावि/७१८९/२०१८ दि.१९/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

शहर अभियंता (स्थापत्य) व सह शहर अभियंता (वि/यां) कार्यालय यांनी दि.१९/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ मध्ये चालू असलेल्या व नियोजीत स्थापत्य प्रकल्प कामामध्ये समाविष्ठ असलेल्या विद्युत विभागाअंतर्गत लेखाशिर्षावर कामे वर्ग करणे, प्रशासकिय मान्यता घेणे व तरतूद र.रू.३३,४६,००,०००/- वर्गीकरण करणे प्रस्तावित केले असून प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली आहे. त्यानुसार सह शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणे प्रशासकिय मान्यता देणेस आणि स्थापत्य प्रकल्प कामांमध्ये समाविष्ठ असलेल्या विद्युत कामांचे विद्युत विभागा अंतर्गत कामे वर्ग करणेस व र.रू.३३,४६,००,०००/- वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.महापालिकासभेची मान्यता घेणेकामी तातडीचे कामकाजा संबंधातील सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील १ (के) अन्वये माहे जून २०१८ चे मा.महापालिकासभेचे कामकाजात दाखल करून घेणेची मागणी मा.महापालिका सभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका

सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.३३,४६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२८ विषय क्रमांक - २१

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१८७/२०१८ दि.१९/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सह शहर अभियंता (वि/यां) कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग अंदाजपत्रक यातून र.रू.८,००,००,०००/- रक्कम वर्गीकरण करता येणे शक्य आहे तरी विद्युत/यांत्रिकी कार्यालयास प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार सह शहर अभियंता विद्युत यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करण्यास, भांडवली/महसूली प अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ च्या तरतूद विद्युत/यांत्रिकी कार्यालय र.रू.८,००,००,०००/- वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.महापालिकासभेची मान्यता घेणेकामी तातडीचे कामकाजा संबंधातील सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील १ (के) अन्वये माहे जून २०१८ चे मा.महापालिकासभेचे कामकाजात दाखल करून घेणेची मागणी मा.महापालिकासभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिकासभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.८,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८२९ विषय क्रमांक - २२

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१४०/२०१८ दि.१५/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) र.रू.९,०५,००,०००/- वर्गीकरण

मान्यता दिलेली आहे. शहर अभियंता स्थापत्य (ह क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.६/६/२०१८ चे प्रस्तावान्वये अंदाजपत्रकातील तरतुदींचा पुरेपुर वापर व्हावा व या कामाचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकिय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील नविन विकास कामे तसेच महानगरपालिका परिसरात तातडीने आवश्यक असलेली कामे लवकरात लवकर सुरू व्हावीत व त्याचा लाभ नागरिकांना व्हावा यासाठी ठराव क्र.१८७ अन्वये अशा कामांना रक्कम वर्गीकरण करून देणेस प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्तावित केले आहे. महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) चे मा.आयुक्त यांनी प्रस्तावावर मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत सुचना दिल्या आहे. तरी शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले नुसार र.रू.९,०५,००,०००/- वर्गीकरण करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद क्र २(१) नुसार अवलोकन करणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.९,०५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३० विषय क्रमांक - २३

दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१४२/२०१८ दि.१५/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) र.रू.१६,००,००,०००/- वर्गीकरण मान्यता दिलेली आहे. शहर अभियंता स्थापत्य (क क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.६/६/२०१८ चे प्रस्तावान्वये अंदाजपत्रकातील तरतुदींचा पुरेपुर वापर व्हावा व या कामाचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकिय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील नविन विकास कामे तसेच महानगरपालिका परिसरात तातडीने आवश्यक असलेली कामे लवकरात लवकर सुरू व्हावीत व त्याचा लाभ नागरिकांना व्हावा यासाठी ठराव क्र.१८७ अन्वये अशा कामांना रक्कम वर्गीकरण करून देणेस प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्तावित केले आहे. महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) चे मा.आयुक्त यांनी प्रस्तावावर मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत सुचना दिल्या आहे. तरी शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले नुसार र.रू.१६,००,००,०००/- वर्गीकरण करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद क्र २(१) नुसार अवलोकन करणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१६,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३१ विषय क्रमांक - २४
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/७१४४/२०१८ दि.१५/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) र.रू.१०,५०,००,०००/- वर्गीकरण मान्यता दिलेली आहे. शहर अभियंता स्थापत्य (इ क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.६/६/२०१८ चे प्रस्तावान्वये अंदाजपत्रकातील तरतुदींचा पुरेपुर वापर व्हावा व या कामाचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकिय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील नविन विकास कामे तसेच महानगरपालिका परिसरात तातडीने आवश्यक असलेली कामे लवकरात लवकर सुरू व्हावीत व त्याचा लाभ नागरिकांना व्हावा यासाठी ठराव क्र.१८७ अन्वये अशा कामांना रक्कम वर्गीकरण करून देणेस प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्तावित केले आहे. महापालिका सभा ठराव क्र.१८७ (दि.२०/४/२०१८) चे मा.आयुक्त यांनी प्रस्तावावर मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवणेबाबत सुचना दिल्या आहे. तरी शहर अभियंता यांनी प्रस्तावित केले नुसार र.रू.१०,५०,००,०००/- वर्गीकरण करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद क्र २(१) नुसार अवलोकन करणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१०,५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३२ विषय क्रमांक - २५
दिनांक – १९/०६/२०१८
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.सारिका लांडगे यांचा प्रस्ताव.

पुणे महानगरपालिके मध्ये शहरी गरीब, वैद्यकिय, सहाय्य योजना राबविली जाते, तिचा अभ्यास करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अशा प्रकारची योजना सुरू करणेबाबत प्रशासनाने आवश्यक तो सविस्तर प्रस्ताव दोन आठवड्यात समिती पुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३३ विषय क्रमांक - २६
दिनांक – १९/०६/२०१८ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ EWSप्र/४०५/२०१८ दि.१९/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे बो-

हाडेवाडी येथील स.नं./गट नं.१२८५पै, १२८७पै व १२९०पै (आरक्षण क्र.१/१६२) येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणेचे काम चालू आहे. सदर प्रकल्पाकरिता Environmental Clearance घेणे आवश्यक आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२४३७, दि.२१/०३/२०१८ अन्वये PMAY प्रकल्पासाठी पर्यावरण सल्लागार म्हणून मे.ग्रीन सर्कल इं. यांची यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे Environmental Clearance पर्यावरण सल्लागार मे.ग्रीन सर्कल इं. यांनी पर्यावरण विभागाकडे ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. पर्यावरण सल्लागार यांनी दि.१८/०६/२०१८ रोजीचे ई-मेल द्वारे कळविलेप्रमाणे Environmental ClearanceScrutiny करिता फी र.रु.७,००,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख फक्त) पर्यावरण विभागाकडे RTGS / NEFT द्वारे भरणेचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**Bank Details for RTGS/NEFT**
Account Name: **SEIAA/SEAC SECRETARIAT**
Bank Name: **State Bank of India**
Bank Account No: **33876812558**
Bank Account Type: **Current Account**
Bank Address: **76-A, Rafi Ahmed Kidwai Rd,Gujarati Kelwani Mandal School,Matunga Br. Mumbai- 400 015.**
IFSC Code: **SBIN0005350**
MICR Code: **400002056**
Email: **cao@mpcb.gov.in / account@mpcb.gov.in**

तरी प्रकल्प सल्लागार यांनी कळविलेनुसार सदर प्रकल्पास Environmental Clearanceमिळणेकामी फी र.रु.७,००,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख फक्त) इतकी RTGS/NEFT द्वारे SEIAA/SEAC SECRETARIAT यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८३४ विषय क्रमांक - २७
दिनांक – १९/०६/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा. सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती ठराव क्र. २८०५, दि. १३/६/२०१८ च्या ठरावामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) ३०,००० चौ फुट बांधकाम असलेल्या गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी देण्यात यांवी.

२) म्हाडाच्या गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी देण्यात यावी.

३) पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत असलेल्या गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी देण्यात यावी.

४) नागरीकांकडून वैयक्तिक बांधकामाचे परवानगीसाठी येणा-या अर्जांना नियमानुसार बांधकाम परवानगी देण्यात यावी.

५) ३०,००१ चौ.फुटा पेक्षा जास्त बांधकाम असलेल्या गृहप्रकल्पांना काही काळ (Temporary period) बांधकाम परवाना न देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/७९३/२०१८
दिनांक - २०/०६/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.गक्षेका/नि-३/कावि/१६३/२०१८, दि.०४/०६/२०१८ विषय क्र.६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगांव -33

(विषयपत्र क्र.गक्षेका/नि-3/कावि/163/2018 दि. 4/06/2018 लगत)

## प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | मे.डी.डी.कन्स्ट्रक्शन | स्थापत्य/ड प्रभाग/Prabhag/5/44/2017-2018 | जिजामाता हॉस्पीटल प्रभाग क्र.४३ मिलिंदनगर परिसरातील स्थापत्य विषयक किरकोळ दुरूस्तीची कामे करणे. | 07/02/2018 | गक्षेका/नि03/कावि/141/2018 | 09/05/2018 | 698498 | -9.00% | 635633 |
| 2) | मे.जय गणेश एंटरप्रायजेस | स्थापत्य/ब प्रभाग/Prabhag/3/31/2017-2018 | प्रभाग क्र. २४ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे | 20/11/2017 | गक्षेका/नि03/कावि/1/2018 | 06/01/2018 | 922346 | -27.27% | 670822 |
| 3) | मे.रूद्र कन्स्ट्रक्शन | स्थापत्य/ब प्रभाग/Prabhag/5/1/2017-2018 | प्रभाग क्र.२४ मध्ये खड्डे, ट्रेंचेस, जीएसबी, वेटमिक्स पध्दतीने बुजविणे | 07/03/2018 | गक्षेका/नि03/कावि/115/2018 | 21/03/2018 | 929477 | -29.01% | 659836 |
| 4) | मे.श्री गणेश वाळकृष्ण पोरे | स्थापत्य/ब प्रभाग/Prabhag/5/6/2017-2018 | प्रभाग क्र. २४ मध्ये सारथी हेल्पलाईनची तक्रार निवारण करणेची कामे करणे | 03/02/2018 | गक्षेका/नि03/कावि/111/2018 | 19/03/2018 | 933382 | -21.65% | 731305 |
| 5) | मे.रूद्र कन्स्ट्रक्शन | स्थापत्य/ब प्रभाग/Prabhag/5/10/2017-2018 | प्रभाग क्र.२४ मधील पाथवेंची दुरुस्ती करणे | 07/03/2018 | गक्षेका/नि03/कावि/116/2018 | 21/03/2018 | 924135 | -30.02% | 646710 |
| | एकूण | - | - | - | - | - | - | - | 3344306 |

सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगांव 33

(जा.क्र.नि/क/कावि/३/२०१८ दि.१२/६/२०१८ विषय क्र.१२ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरा १८
क क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभाग
जा.क्र. कक्षेका/कावि/ ३ /२०१८
दि.१२/ ६ / २०१८

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| 1 | मे.जी एस इलेक्ट्रीकल्स | 5/11-2017-18 | क.क्षे.कार्या.अंतर्गत माहे एप्रिल २०१८ मध्ये होणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकर म.फुले. जयंती महोत्सव कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपण व विद्युत व्यवस्थ करणे. | 08/03/2018 | क्र.कक्षे/नि.क/कावि /170/2018 | 26/3/2018 | 932671 | 5.50 | % कमी | 881374 |

क्षेत्रीय अधिकारी
कार्यकारी अभियंता
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

(क्र.डक्षेका/३/कावि/३८०/२०१८ दि.१५/६/२०१८ विषय क्र. १६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17

(विषयपत्र क्र.डक्षेका/3/कावि/ /2018 दि. /06/2018 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. टॅनजेट इलेक्ट्रिकल्स ऑन्ड कॉन्ट्रॅक्टर, | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/10/3/2017 -2018 | ड प्रभाग अंतर्गत प्रभाग क्र. २८ मधील पिंपळे सौदागर गावठाण व इतर परिसरातील स्ट्रीट लाईटची देखभाल दुरुस्ती व अनुषंगीक कामे करणे. | 10/05/2018 | डक्षेका/03/कावि/368/2018 | 06/06/2018 | 930756 | -18.50% कमी | 758566 |
| | एकुण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 758566 |

सहा. आयुक्त

तथा क्षेत्रिय अधिकारी

ड क्षेत्रीय कार्यालय रहाटणी-17

पिंपरी चिंचवड महानगरपालिका